दिव्य मराठी
बीड जिल्हा 15-01-2025

बीड. बुधवार, १५ जानेवारी २०२५ | ३

# योगेश्वरी महाविद्यालयाच्या सायबर वॉरिअर्स राज्यपालांच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी | अंबाजोगाई

येथील योगेश्वरी महाविद्यालयातील सायबर वॉरिअर्स विद्यार्थ्यांचा पुणे येथे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरसकार देऊन गौरव करण्यात आला.

योगेश्वरी महाविद्यालय व क्विक हिल फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने राबविण्यात येणाऱ्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियाना अंतर्गत सायबर सुरक्षे विषयी जनजागृतीच्या उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. या अभियानात महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील प्रगती थावरे प्रथम, आदर्श डोंगरे, श्रावणी कुलकर्णी व्दितीय पुरस्कार मिळाला आहे. कार्यक्रमासाठी अनुपमा काटकर, कुलगुरू प्रकाश महानवर,संजय शिंत्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. व्ही कानेटकर, अभियानाचे शिक्षक समन्वयक संगणक विभाग प्रमुख प्रा. डॉ.आर.जी.जोशी हे विद्यार्थ्यांसोबत सत्कार सोहळ्यामध्ये निमंत्रित म्हणून उपस्थित होते.